ePaper

## शिंदेविरोधात हायकोर्टात याचिका; दसरा मेळाव्याच्या खर्चाची चौकशीची मागणी



| वर्ष - 6 | अंक - 176 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार | दिनांक 8 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- रस्ते दुरुस्तीवर दहा वर्षांत २२१ कोटींची उधळपट्टी
- विधायक उपक्रम : हिराबाई लांडगे यांच्या स्मरणार्थ मोफत रुग्णवाहिका लोकार्पण
- या कुपोषणाचे काय?


# रिक्षाचालकांचा मोर्चा!

## बाबा कांबळे : बेकायदेशीर दुचाकी वाहतूक न थांबल्यास आझाद मैदानावर तीव्र निदर्शने

**।पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**सरकारने गरिबांमध्ये भांडण लावण्याचे काम बंद केले आहे. बेकादेशीर वाहतूक बंद करणे गरजेचे आहे. रिक्षा व्यवसाय अडचणी मध्ये आला आहे. आमच्याकडे लायसन आहे. बॅच आहे आणि परवाना आहे. परंतु लायसन बॅच, परवाना नसताना दुचाकी मधून अत्यंत चुकीच्या व धोकादायक पद्धतीने वाहतूक सुरू आहे. हे थांबले पाहिजे. अन्यथा मुंबई मध्ये आझाद मैदानात रिक्षा चालकांसह आंदोलन करू, असा इशार. महाराष्ट्र रिक्षा पंचायत अध्यक्ष बाबा कांबळे यांनी दिला.**



छत्रपती शाहू महाराजांच्या केएसबी चौकातील पुतळ्यास पुष्पहार घालून मोर्चाला सुरुवात करण्यात आली. केसरी चौक ते आरटीओ पर्यंत रिक्षासह मोर्चा आयोजित करण्यात आला. या वेळी बाबा कांबळे बोलत होते.

या वेळी घरकाम महिला सभा अध्यक्ष आशा कांबळे , बाळासाहेब ढवळे, लक्ष्मण शेलार, संतोष गुंड, पप्पू गवारे, हिरामण गवारे, संजय दौंडकर, अनिल शिरसाट, जाफर शेख, रवींद्र लंके, प्रदीप आयर, सिद्धार्थ साबळे, अफरोज कोतवाल, जयराम शिंदे, धनंजय कुदळे, गणपत कांबळे, गणेश गाढवे, अजय साळवे, अविनाश जोगदंड, तुषार लोंढे, योगेश जाधव, सुरज सोनवणे, समीर इनामदार, सोमनाथ शिंदे,आदी उपस्थित होते.

बाबा कांबळे म्हणाले की, रिक्षा चालकांचे प्रश्न न सोडवल्यास आंदोलन अधिक तीव्र करणार आहे. बेकायदेशीर दुचाकी व्यवसाय करणाऱ्या कंपनीवर गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे. ही कारवाई बंद करावी. रिक्षा चालक मालकांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचे रखडले आहे. त्याला मूर्त स्वरूप द्यावे. रिक्षा चालकांना सीएनजीसाठी केंद्राने २५ टक्के व राज्याने 25 टक्के असे 50 टक्के अनुदान द्यावे. रिक्षा चालक मालकांसाठी घरकुल योजना सुरू करावी.मुक्त परवाना बंद करा,या मागण्यासाठी खासगी वाहतूक कंपन्यांनी वाहतुकीबद्दल उच्च न्यायालयाची फसवणूक करत ॲप सुरू केले आहे. उच्च न्यायालयाचा अवमान आहे. या प्रकरणी कंपन्यावरती एफआर दाखल झाला पाहिजे. या वेळी दोन दिवसात बेकादेशीर वाहतूक करणाऱ्या कंपन्यावरती कायदेशीर कारवाई करू, असे आश्वासन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे, श्री ओतारी, श्री,आव्हाड, यांनी दिले. या वेळी रिक्षा चालक, मालकांचे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

# युवा नेते शाम जगताप यांना 'समाजरत्न पुरस्कार'

## पिंपरी- चिंचवड कलाकार संघाचा बारावा वर्धापनदिन : अभिनेत्री सुरेखा कुडची यांची उपस्थिती

**। पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**राष्ट्रवादीचे युवा नेते शाम जगताप यांना अभिनेत्री सुरेखा कुडची यांच्या हस्ते 'समाज रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पिंपरी- चिंचवड कलाकार संघाचा बारावा वर्धापनदिन चिंचवड येथील रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे उत्साहात साजरा करण्यात आला.**



याप्रसंगी प्रमुख पाहुणे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराज राजे भोसले, सिने अभिनेत्री सुरेखा कुडची, सुरेखा दिलीप मोहिते पाटील, ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर, अभिनेते प्रसिद्ध उद्योजक संतोष चव्हाण, अभिनेते, दौलतराव जाधव, पिंपरी चिंचवड कलाकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार उलपे आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. याप्रसंगी वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले.

पिंपळे गुरव येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पिंपरी चिंचवड शहर कार्याध्यक्ष शाम जगताप यांना अभिनेत्री सुरेखा कुडची यांच्या हस्ते 'समाज रत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

# रस्ते दुरुस्तीवर 10 वर्षांत 221 कोटींची उधळपट्टी

## पथ विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

।पुणे
।महाईन्यूज।

रस्ते दुरुस्तीच्या नावाखाली महापालिकेच्या पथ विभागाने गेल्या दहा वर्षांत तब्बल २२१ कोटी रुपयांचा खर्च केला आहे. दरवर्षी महापालिकेच्या तिजोरीतून कोट्यवधी रुपये खर्च करूनही रस्त्यांवरील खड्डे कायम असल्याने हा खर्च उधळपट्टीच ठरला आहे. गेल्या दहा वर्षांत रस्ते दुरुस्तीसाठी महापालिकेच्या पथ विभागाला ३४१ कोटींची तरतूद उपलब्ध करून देण्यात आली. त्यापैकी २२१ कोटींचा खर्च रस्ते दुरुस्तीवर करण्यात आला आहे. रस्ते दुरुस्तीसाठीची १२० कोटींची रक्कम खर्च करण्यात आलेली नाही. त्यामुळे महापालिकेच्या



कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याने रस्ते दुरुस्ती, डांबरीकरणाची प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी शंभर कोटी रुपयांचा निधी आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी उपलब्ध करून दिला आहे.

गेल्या काही वर्षांपासून रस्ते दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होत असला, तरी रस्त्यांची दुरवस्था कायम असल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे दरवर्षी शेकडो कोटी रुपये खर्च केल्यानंतरही रस्ते योग्य पद्धतीने दुरुस्त का होत नाहीत, अशी विचारणा नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरवर्षी महापालिकेला रस्ते दुरुस्तीसाठी ३४१ कोटींचा निधी उपलब्ध झाल्याची माहिती महापालिकेच्या पथ विभागाकडून देण्यात आली आहे. उपलब्ध तरतुदीपैकी केवळ ६४.८१ टक्के निधीचा प्रत्यक्ष वापर रस्ते दुरुस्तीवर झाला आहे.सन २०१६-१७ या वर्षात सर्वाधिक ७३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यातील ४९ कोटी रुपये रस्ते दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आले. त्यातील ३८ कोटी रुपये पाणीपुरवठा, मल:निस्सारण, गॅस आणि महावितरणाच्या वाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी खर्च करण्यात आले.दोन वर्षांपूर्वी करोना संसर्गाच्या कालावधीतील दोन आर्थिक वर्षातही ८६ कोटींच्या एकूण तरतुदीपैकी ६० कोटींचा खर्च करण्यात आला. मात्र त्यानंतरही रस्त्यांच्या कामांचा दर्जा निकृष्ट राहिल्याचे दिसून आले. गेल्या दोन वर्षांत सर्वाधिक खर्च करूनही यंदा रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्याची वस्तुस्थिती आहे. शहरातील स्वयंसेवी संस्था, नागरिकांनी आणि वाहनचालकांनी त्याबाबत महापालिकेच्या पथ विभागाकडे शेकडो तक्रारी नोंदविल्या आहेत.

महापालिकेच्या अंदाजपत्रकातील तरतुदीपैकी केवळ दहा टक्के निधी रस्ते पूर्ववत करण्यासाठी आणि दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आला आहे. रस्ते सुस्थितीत राहावेत, यासाठी महापालिकेने यंदा तीस प्रमुख रस्त्यांची निवड केली आहे. या रस्त्यांचे पुनरुज्जीवन केले जाणार असून जड वाहतुकीनंतरही हे रस्ते खराब होणार नाहीत, या दृष्टीने रस्त्यांवर कामे केली जाणार आहेत. येत्या काही दिवसांत या तीस रस्त्यांवरील कामे सुरू करण्यात येणार असल्याची माहिती पथ विभागाकडून देण्यात आली.

### 400 कोटींची आवश्यकता

शहरातील रस्त्यांची एकूण लांबी १ हजार ४०० किलोमीटर आहे. रस्ते दुरुस्तीसाठी दरवर्षी किमान ४०० कोटींची आवश्यकता असते. देखभाल दुरुस्ती दायित्व कालावधीत केलेले रस्ते वगळता अन्य रस्त्यांसाठी हा निधी खर्च केला जातो. मात्र निधीच्या कमतरतेमुळे रस्ते दुरुस्ती अडचणीची ठरत आहे.

– **डॉ. कुणाल खेमनार,** अतिरिक्त आयुक्त

# “आई-वडिलांना शिव्या द्या चालेल पण मोदी, शाहांना शिव्या देणं सहन करु शकत नाही

## जाहीर भाषणात चंद्रकांत पाटलांचं विधान

।पुणे। महाईन्यूज ।

राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचा गुरुवारी पुण्यामध्ये सत्कार करण्यात आला. पुण्याच्या पालकमंत्री पदावर पाटील यांची निवड झाल्याने पुणे भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित सत्कार समारंभाच्या भाषणात बोलताना चंद्रकांत पाटलांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा उल्लेख करत एक विधान केलं. मोदी आणि शाह यांना शिव्या घातलेल्या चंद्रकांत पाटलांना चालणार नाही. आई-वडिलांना शिव्या द्या चालेल पण मोदी आणि शाहांना शिव्या दिलेल्या चालणार नाही असं एका नेत्याने आपल्याबद्दल शेतकरी संघटनेचे नेते असणाऱ्या राजू शेट्टी यांना सांगितल्याचा दावा चंद्रकांत पाटलांनी केला आहे.

चंद्रकांत पाटील यांनी भाषणाच्या सुरुवातीला आयोजकांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. त्यानंतर कोथरुड मतदारसंघामधून



पाटील यांनी देण्यात आलेली संधी आणि त्यावरुन झालेला वाद याबद्दल भाष्य केलं.

पक्षाने काहीतरी विचार करुन आपल्याला या मतदारसंघातून उमेदवारी दिल्याचा दावा करताना पाटील यांनी यापूर्वी आपण सांगली, कोल्हापूर, सातारा आणि सोलापूरमध्ये काम केल्याचा दाखला दिला. आपल्या नेतृत्वाखाली कशाप्रकारे आपण विरोधकांना पराभूत केलं यासंदर्भात माहिती सांगताना पाटील यांना हातकणंगले मतदारसंघातील निवडणूक आणि त्यावेळी झालेल्या आरोप प्रत्यारोपांचा उल्लेख केला. या निवडणूक प्रचारामध्ये राजू शेट्टी हे अनेकदा पंतप्रधान मोदींना शिवागाळ करत होते असा दावा पाटील यांनी केला. मात्र आपण शेट्टींना सव्वा लाख मतांनी हरवलं असं चंद्रकांत पाटील म्हणाले. चंद्रकांत पाटील राज्यात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष असल्याचा हा काळ होता. त्याचा संदर्भ देत ते बोलत होते.

“२०१९ ला काय उचललं मला आणि आणलं पुण्याला असं झालं नाही. यामागे काहीतरी नियोजन असणार. करोनामुळे आणि सरकार गेल्याने हे नियोजन अर्धवट राहिलं आहे. ते पूर्ण करायचं आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर साफ झालं. माढा पवार उभे राहणार होते. काय झालं? नाही उभे राहिले. रणजित निंबाळकर विजयी झाले. ८४ हजार मतांनी जिंकले. हातकणंगल्यात रोज उठून आमचे शेट्टी शिव्या द्यायचे. रोज उठून मोदींना शिव्या. माझे खूप चांगले मित्र आहेत. म्हटलं तुम्ही चूक करताय. ते अशा भावनेत होते की मला कोण हरवणार. सव्वा लाख मतांनी हारवलं त्यांना,” असं पाटील म्हणाले.

पुढे पाटील यांनी शेट्टी आणि भाजपाच्या एका केंद्रीय मंत्र्याच्या भेटीमधील चर्चेसंदर्भात सांगितलं. “परवा आपल्या एका केंद्रीय नेत्याची आणि त्यांची भेट झाल्यानंतर ते म्हणाले की दादांनी मला संपवलं. ते केंद्रीय नेते ४० वर्ष माझ्याशी जोडलेले असल्याने म्हणाले की दादा कोणाला संपवत नाही. आई-वडिलांना शिव्या द्या चालेल. ते म्हणतील जाऊ दे. आईवरुन शिव्या देणं आमची कोल्हापूरची पद्धत आहे. पण दादा (चंद्रकांत पाटील) मोदी आणि शाहांना शिव्या देणं सहन करु शकत नाही. नशीब पाडला. बाकी काही करायचा त्याचा स्वभाव नाही,” असं विधान चंद्रकांत पाटील आपल्याबद्दल चर्चा झाल्याचं सांगताना केलं.

# पुणे महापालिकेकडून आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा!



।पुणे। महाईन्यूज ।

सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्राबरोबरच खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या १४ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून पुरस्कारांची घोषणा करण्यात आली.पुरस्कारप्राप्त १४ शिक्षकांपैकी १० शिक्षक महापालिका शाळेतील, तर उर्वरित ४ शिक्षक खाजगी प्राथमिक शाळेतील आहेत.आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी ५९ प्रस्ताव प्राथमिक शिक्षण विभागाकडे आले होते. त्या प्रस्तावांतून गुणवंत शिक्षक निवडण्यासाठी शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात आली होती. राज्य सरकारच्या निकषाप्रमाणे आलेल्या प्रस्तावांमधून आदर्श शिक्षक निवडण्यात आल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

आदर्श शिक्षक पुरस्कार्थी शिक्षकांना मानपत्र, सन्मानचिन्ह तसेच टॅब देवून गौरविण्यात येणार आहे. अंकुश माने (कात्रज), ज्ञानेश हंबीर (खराडी), नवनाथ भोसले (खराडी), रजनी गोडसे (वडगाव शेरी), हेमलता चव्हाण (कात्रज), विजय माने (हडपसर), राणी कुलकर्णी (कात्रज), चित्रा पेंढारकर (वारजे), स्मिता धारूरकर (हिंगणे खुर्द), वर्षा पंचभाई ( ढोले पाटील रोड) या दहा महापालिका शिक्षकांना पुरस्कार जाहीर झाला आहे. पुष्पा देशमाने, रोहिणी हमाडे, डॉ. प्रीती मानेकर आणि शुभदा शिरोडे या खासगी शाळेतील पुरस्कार विजेत्या शिक्षकांची नावे आहेत.

## विधायक उपक्रम : हिराबाई लांडगे यांच्या स्मरणार्थ मोफत रुग्णवाहिका लोकार्पण!

# सामाजिक बांधिलकी अन् नेत्याप्रति निष्ठा!

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

सामाजिक- राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा मिळेल, असा आदर्श सामाजिक कार्यकर्त्या शितल वर्णेकर यांनी आपल्या कृतीतून घालून दिला आहे. आपल्या वाढदिनी सामाजिक बांधिलकी जप्त रुपीनगर-तळवडे परिसरातील नागरिकांसाठी रुग्णवाहिकचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमाचे सर्वसामान्य नागरिकांमधून कौतूक होत आहे.



विशेष म्हणजे, भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या मातोश्री कै. सौ. हिराबाई लांडगे यांना देवाज्ञा झाली. या दु:खात सहभागी होत भाजपा महिला आघाडीच्या शहर उपाध्यक्षा असलेल्या शितल वर्णेकर यांनी आपल्या वाढदिनी (दि.९ ऑक्टोबर) असलेले विविध कार्यक्रम रद्द केले. तसेच, "आईचे प्रेम अगणित आहे आईचे महत्व आपल्या जीवनामध्ये खूप आहे आपला आपला प्रत्येक दिवस आईमुळे असतो. आमदार लांडगे यांची आई माझ्या आई समान आहे. त्यांचे दु:ख हे माझे दु:ख आहे." अशी भूमिका ठेवत कोणत्याही प्रकारचा कार्यक्रम साजरा करणार नाही, असा संकल्प वर्णेकर यांनी केला आहे.

दरम्यान, कै. सौ. हिराबाई किसनराव लांडगे यांच्या स्मरणार्थ सामाजिक उपक्रमाअंतर्गत प्रभागातील नागरिकांच्या आरोग्यासाठी नेहमीच गरज असलेली वैद्यकीय सेवा म्हणजेच मोफत रुग्णवाहिक सेवा लोकार्पण सोहळा दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर आयोजित करण्यात आला. त्यामुळे अनेक गरजू व्यक्तीसाठी सदर रुग्णवाहिका सेवा उपलब्ध झाली आहे. यावेळी आमदार महेश लांडगे, उद्योजक रोहिदास गाडे, माजी नगरसेवक शांताराम बापू भालेकर, माजी स्वीकृत नगरसेवक पांडुरंग भालेकर, डॉ. धनंजय वर्णेकर, ज्ञानदीप संस्थेचे अध्यक्ष एस. डी. भालेकर, उद्योजक गंगा भालेकर, युवा नेते शरद भालेकर, विशाल मानकरी, दादासाहेब नरळे, सर्जेराव कचरे, नितीन शिंदे, सुजाता काटे, अक्षय तांबे सुबोध साळवे, श्रेयस भालेकर, शिवाजी वायकुळे, भाऊसाहेब काळोखे, अभिजीत गिरी दिग्विजय सवई , हर्षल भंडारी, ज्ञानदीप शिक्षण प्रसारक संस्थेचे रमेश भालेकर, युवा नेते शिरीष उतेकर, दादा सातपुते, रामदास कुटे, अनिल भालेकर, सोमनाथ मेमाणे, सामाजिक कार्यकर्ते संदीप जाधव, कमलेश भालेकर, नीता शिंदे, शितल पारखी आदी उपस्थित होते.

### वर्णेकर परिवाराचे समाजासाठी योगदान...

एच. डी. भालेकर म्हणाले की, खऱ्या अर्थाने समाजातील सर्व घटकाकरिता शितलताई यांचे कार्य मोठे आहे वर्णेकर परिवाराकडून नेहमीच वेगवेगळ्या प्रकारचे समाज हिताचे कार्य केले जाते वैद्यकीय सेवा हे एक फार मोठे काम आहे. कै.सौ हिराबाई किसनराव लांडगे यांच्या स्मरणार्थ समाजासाठी दिलेली रुग्णवाहिका म्हणजे आई करता दिलेली श्रद्धांजली आहे.

> माझ्या प्रभागामध्ये अनेक सर्वसामान्य लोक राहतात रात्री अपरात्री वैद्यकीय सेवा मिळवणे खूप अवघड जाते. वेळेमध्ये दिलेली वैद्यकीय सेवा याला फार महत्त्व आहे. यासाठी दसऱ्याच्या मुहूर्तावर व आई समान असलेल्या कै. हिराबाई लांडगे यांची आठवण कायम राहावी म्हणूनही मोफत रुग्णवाहिका सेवा आम्ही उपलब्ध करून देत आहे.
>
> **-शितल वर्णेकर,** उपाध्यक्षा, भाजपा, महिला आघाडी, पिंपरी-चिंचवड.

---

# वाहन खरेदीत पिंपरी-चिंचवडकरांनी साधला 'मुहूर्त'

## 'आरटीओ'च्या तिजोरीत 69 कोटी 79 लाख रुपये महसुलाची भर

**पुणे। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवडकरांनी दसरा खरेदीच्या मुहूर्तावर वाहन खरेदीला पसंदी दिली आहे. ०१ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोंबर २०२२ या कालावधीत दुचाकी, चारचाकी तसेच, इतर वाहने मिळून १४ हजार ५६७ वाहन खरेदीची नोंद पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात झाली आहे. त्या माध्यमातून 'आरटीओ'च्या तिजोरीत ६९ कोटी ७९ लाख रुपये महसुलाची भर पडली.



दुचाकी, कुटुंबासाठी मोटार आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून वाहन खरेदी जोरदार झालेली आहे. बहुतांश जणांनी मुहूर्त साधण्यासाठी पंधरा दिवसांपूर्वी बुकिंग करून ठेवले होते. नवीन वाहनांना सर्वाधिक पसंती असल्याचे दिसून आले. वाहन खरेदीमध्ये अॅडाप्टेड व्हेइकल, अॅग्रीकल्चर ट्रॅक्टर, रुग्णवाहिका, आटिक्युलेटेड व्हेइकल, बस, कॅश व्हॅन, कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट व्हेइकल, क्रेन माउंटेड व्हेइकल, डंपर, अर्थ मूव्हींग इक्विपमेंट, इ-रिक्षा, एक्साव्हेटर, फाइल टेंडर, फोर्क लिफ्ट, स्कूटर साइड कार, मोटाराइज्ड सायकल, ट्रेलर, व्हिंटेज मोटारीं अशा विविध प्रकारच्या वाहनांची खरेदी करण्यात आली.

### दसरा मुहूर्तावर झालेली वाहन खरेदी

| प्रकार | संख्या |
|---|---|
| तीन चाकी मालवाहतूक | : १२२ |
| तीन चाकी प्रवासी रिक्षा | : २८३ |
| मोटार | : ४२९३ |
| मोटार सायकल | : ८४४८ |
| मालवाहतूक | : ९३५ |
| ट्रॅक्टर | : १६६ |
| मोटार कॅब | : १६३ |
| बस | : ६१ |
| व्हॅन | : २१ |
| इतर | : ७५ |
| एकूण वाहने | : १४, ५६७ |
| एकूण उलाढाल | : ६९ कोटी ७९ लाख १९ हजार १८८. |

# पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचाऱ्यांचा डबल धमाका

## 50 हजार ते अडीच लाख रुपये बोनस मिळणार

**पुणे। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**



कोरोना काळातही पिंपरी-चिंचवड महापालिकेने (PCMC) गेल्यावर्षी (२०२०-२१)आपल्या साडेसात हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना एक पगार (८.३३ टक्के) अधिक वीस हजार रुपये जादा रक्कम असा दिवाळी बोनस दिला होता.यावर्षीही (२०२१-२२)तेवढाच बोनस जाहीर करून आपल्या कर्मचाऱ्यांची दिवाळी डबल गोड करणारी पिंपरी ही राज्यातील पहिली पालिका ठरली आहे. ५८ कोटी रुपयांचा बोनस (BONUS) ती यावर्षी वाटणार आहे. त्यामुळे किमान पन्नास हजार ते कमाल अडीच लाख रुपये बोनस प्रत्येक कर्मचारी,अधिकाऱ्याला मिळणार आहे. त्यात आयएएस अधिकारी ालिका आयुक्त यांचा सुद्धा समावेश आहे.

तसा कामगारांना कायद्याने आता बोनस (मूळ वेतन अधिक महागाई भत्ता म्हणजे बेसिक प्लस डीए) देता येत नाही, पण, त्यातून पळवाट काढून सानुग्रह अनुदान या नावाने आता तो दिला जात आहे वा घेतला जात आहे. उत्पादक म्हणजे उद्योगातील कामगारांच्या जोडीने इतर म्हणजे सरकारी,बिगरसरकारी कर्मचारी,अधिकारीही तो घेत आहेत. पिंपरी पालिकेचे लाखात पगार घेणारे आयुक्त,अतिरिक्त आयुक्त, मुख्य अभियंता,कार्यकारी अभियंता व वरिष्ठ डॉक्टर हे सुद्धा तो घेत आहेत.

दरवर्षी तो देण्याचा पाच वर्षासाठी करारच करण्यात आला आहे. म्हणजे २०२०-२१ ते २०२४-२५ अशा पाच वर्षात तीनशे कोटी रुपये बोनसवर खर्च होणार आहेत. यावेळी सेवेतील कर्मचारी,अधिकारीच नाही, तर वर्षभरात निलंबित झालेले आणि सेवानिवृत्ती घेतलेल्यांनी तो दिला जाणार आहे.

## संपादकीय

# कलगीतुरा

***माजी मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांच्या मते हा निकाल तडकाफडकी लागणारा नाही. त्याला कित्येक महिनेही लागू शकतात. दरम्यान निवडणुका आल्याच तर चिन्ह गोठवलेही जाऊ शकते. त्यामुळे, अंधेरी पूर्व मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुकीत या चिन्हाचे काय होते, हे लवकरच समजेल. तेव्हा, मेळाव्यांच्या व्यासपीठावर निवडणूक चिन्ह्यांच्या कितीही मोठ्या प्रतिकृती दोघांनीही बनविल्या, तरी त्याला मर्यादितच अर्थ आहे.***

विजयादशमीच्या मुहूर्तावर महाराष्ट्रात आपट्याच्या पानांच्या सोन्यापेक्षा विचारांचे सोनेच अधिक लुटले जाऊ लागले आहे. यंदा करोनाच्या खंडानंतर महाराष्ट्राच्या वैचारिक सुवर्ण लुटीमध्ये आणखी भर पडली. म्हणजे, म्हटले तर सकाळी विदर्भात नागपूरचे भाषण, त्यानंतर मराठवाड्यातला भगवान गडावरचा मेळावा आणि नंतर मुंबईचा. यंदा मुंबईत शिवसेनेचे दोन मेळावे झाल्याने मराठी माणसाच्या वैचारिक श्रीमंतीत आणखी भर पडली. 'आमचीच शिवसेना खरी' या एका दाव्यासाठी शिवतीर्थ आणि बीकेसीचे मैदान येथे जास्तीत जास्त श्रोते जमविण्याची जी आसुरी स्पर्धा गेला महिनाभर चालू होती; तिचा समारोप एकमेकांवर चिखलफेक, पुन्हा पुन्हा तेच आरोप आणि कंठाळी पद्धतीने दिलेली आव्हाने यांनी झाला. या कंटाळवाण्या कलगीतुऱ्यात महाराष्ट्राच्या हिताचा, महाराष्ट्रातील जनतेच्या कल्याणाचा विचार किंवा काही कृती कार्यक्रम तोंडी लावण्यापुरता होता. यात पारडे कुणाचे जड झाले किंवा कुणी कुणाला मात दिली; याचेही निष्कर्ष महाराष्ट्राच्या हिताचा निकष न लावता 'आपला कल कुणाकडे आहे' याला कौल लावून काढले जात आहेत. कुणाची तरी बाजू घेतल्याशिवाय आपल्या वैचारिक संपदेचे सार्थकच होणार नाही, असा भ्रम काही माध्यमांसहित बहुतेक बुद्धिजीवी तसेच समाज माध्यमवीरांना झाला आहे. शिवसेनेत मोठी फूट पडल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जिद्दीने शिवतीर्थावर इतका मोठा मेळावा घेतला, हे विशेष आहे. मात्र, एवढे मोठे मेळावे वक्त्यांच्या जिभेवर नाचणाऱ्या सरस्वतीपेक्षा नेत्यांच्या खिशातल्या 'लक्ष्मी'मुळे अधिक प्रसन्न दिसतात, हे वेगळे सांगायला नको. दोन्ही मेळाव्यांसाठी नोंदणी केलेल्या गाड्यांची संख्या, जेवणा-खाण्याची व्यवस्था आणि इतर सोयी यांची आकडेवारी चकित करणारी नव्हे; तर शिसारी आणणारी होती. गाळात चाललेल्या एसटी महामंडळाला तात्पुरता आधार आणि अनेक बेरोजगार तरुणांना दोन दिवसांची सफर या पलीकडे या हजारो लोकांचे असे काय मोठे वैचारिक उद्बोधन या मेळाव्यांनी केले? शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काय किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय; या दोघांच्याही भाषणात अवाक्षरही नवे नव्हते. नवे सरकार येऊन आता शंभर दिवस झाले. किती दिवस दोन्हीकडचे नेते तेच तेच बोलून महाराष्ट्राचा अंत पाहणार आहेत? मुख्यमंत्र्यांचे भाषण शिवाजी पार्कवर ठाकरे काय बोलतात, याचा अंदाज घेत चालले होते की काय, कळत नाही.

# या कुपोषणाचे काय?




गरिबीमुळे देशात कुपोषण आहे हे खरेच. पण शहरी नागरिकही चुकीच्या संकल्पनांच्या आहारी जाऊन चुकीचा आहार घेत आहेत. त्यातून कुपोषण आणि विविध आजारांना निमंत्रण मिळत आहे. हे कुपोषण कसे थांबणार?

देशात ३३ लाख मुले कुपोषित आहेत. ही मुले आदिवासी, ग्रामीण अथवा गरीब असतात. परंतु सधन वर्गातील केवळ मुलेच नव्हे तर अनेक जण कुपोषित असतात, याचा विचार आपण कधी करतो का? परिस्थितीमुळे झालेले कुपोषण आणि स्वतः ओढवून घेतलेलं कुपोषण असे दोन प्रकार आहेत, त्याकडे आपण दुर्लक्ष करतो त्याचा फटका भविष्यात नक्कीच बसणार आहे. आज जगातल्या औषध कंपन्यांचा नफा आणि वार्षिक वृद्धीचे आलेख पाहिले तर लक्षात येते की, लाखो करोडो रुपये आपण औषधे आणि आरोग्य सेवांवर घालवत आहोत. म्हणजे बऱ्याच जणांनी आपले आरोग्य औषधांवर सोपवले आहे. पण मुळात आपले अन्न जे आपल्याला ऊर्जा देतं, आरोग्य सुस्थितीत ठेवतं आणि शरीराची झीज भरून काढण्यास मदत करतं, त्याविषयी मात्र शहरातील नागरिक तितके जागृत नाहीत.

औद्योगिक प्रक्रिया करून बनवलेल्या अन्नसाखळीत आपण कसे अडकलो हे जाणून घेण्यासाठी थोडा मानवी इतिहास बघूया. २५ लाख वर्षांपूर्वी होमो सेपियन या मानवाच्या प्रजातीच्या वंशजांच्या उत्क्रांतीला सुरुवात झाली. लाखो वर्षे मानव शिकार आणि अन्न गोळा करत राहात होता. त्यावेळी मानव फळे, वनस्पती, मांस, कंद असे अनेक प्रकारचे वैविध्य पूर्ण आणि पोषक अन्न खात होता. बारा हजार वर्षांपूर्वी शेतीचा शोध लागला. युवल नोव्हा हेरारी याने सेपियन या पुस्तकात शेतीला मानवी इतिहासातील फसवणूक असं म्हटलं आहे. शेतीमुळे मानवाला स्थिरता आली. त्याच्या आहारातील विविधता कमी झाली. सहज अन्न उपलब्धतेमुळे लोकसंख्या वाढत गेली. शेतीच्या उत्पादनाच्या वाढीपेक्षा खूप मोठ्या पटीने लोकसंख्या वाढली. अन्न सुरक्षिततेसाठी मग शेती उत्पादन वाढवण्यासाठी जगभर संशोधन झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर भारतातही हरित क्रांती झाली. शेतीकडे औद्योगिक दृष्टीने बघत, पोषण दुर्लक्षित करून फक्त एकरी उत्पादन अधिक कसे वाढवता येईल, यावर सरकारे संशोधनातून पैसे खर्च करू लागली आणि आणि योजना आणू लागली. तेव्हापासून शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य, मानवी आरोग्य आणि निसर्ग यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली.

औद्योगिक शेतीत पारंपारिक वाणाच्या जागी संकरित बीजे आली. नैसर्गिक खत आणि नैसर्गिक पद्धतीने कीटकांचा बंदोबस्त करण्याची प्रक्रिया जाऊन रासायनिक खते, कीटकनाशके आणि ग्लयफोसेटसारखी तणनाशके आली. उत्पादनात वाढ झाली पण पोषण कमी झाले. नफा वाढला पण तो फक्त रासायनिक कंपन्यांचा, अन्न उद्योजकांचा, व्यापारी आणि दलालांचा. रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीचा कस कमी होत गेला. यामुळे, अधिक रसायनांचा वापर करा, अधिक उत्पादन देणारी बीजे वापरा असं सांगण्यात आलं. याचा शेतकऱ्यावर अधिक आर्थिक बोजा पडला आणि ही बीजे पुरवणाऱ्या एकाधिकारी कंपन्यांवर अवलंबून राहणं अनिवार्य झालं. यात भर म्हणजे हवामान बदलामुळे होणारे शेतीचे नुकसान. निसर्गाशी समन्वय साधण्यापेक्षा त्याच्यावर मात करण्याचा प्रयत्न चालू झाला. अधिक प्रक्रिया केलेल्या कमी पोषण देणाऱ्या अन्नाचा वापर, कीटकनाशक आणि तणनाशक विषांचा अन्नातून होणारा प्रभाव आणि फक्त तीन किंवा चार प्रकारच्या पिकांचा प्रमुख अन्न म्हणून वापर, निसर्गाचा ऱ्हास आणि प्रदूषण या सर्वांचा परिणाम आरोग्यावर होत आहे. आपली बदललेली जीवनशैलीसुद्धा याला कारणीभूत आहे.



जाहिरातीतून आणि अन्य माध्यमातून अन्न कंपन्या आम्हाला सांगू लागल्या की आम्ही काय खायचे? पॅकेट फूड, रेडी टू इट, फास्ट फूड अशा अनेक स्वरूपात, स्वस्त, पटकन खाण्यास सोयीस्कर, जास्त टिकणारे, सर्व ऋतूंमध्ये मिळणारे अशा स्वरूपात अन्न आपल्यासमोर आले. मे-जून महिन्यात पिकणारा आंबा आम्हाला जानेवारीत खायचा असतो आणि हिमाचल प्रदेशात किंवा परदेशात पिकणारी सफरचंदे महाराष्ट्रात बाराही महिने खायची असतात. आपल्याला परवडत किंवा फॅशन म्हणूनही आपण अन्न विकत घेऊ लागलो. उपमा, पोहे, शिरा, इडली, डोसा अशा अनेक पारंपरिक न्याहरीचे पर्याय जाऊन त्यांची जागा ओट्स, सिरियल्स, कॉर्न फ्लेक्स यांनी घेतली. मायकल पोलन यांनी लिहिलेल्या 'ओम्निवोर्स डिलेमा' या पुस्तकात अमेरिकन कॉर्न संस्कृती आणि त्याचे दुष्परिणाम वाचून थक्क व्हायला होतं. प्रक्रिया केलेल्या अन्नात प्रिजर्वेटिव्ह, फोर्टिफाइड, रिफाईंड, टेस्ट मेकर अशा गोंडस नावाखाली कृत्रिम रसायनांचा वापर वाढला. शेतात वापरलेली ही रसायने पावसाच्या पाण्यातून नद्या आणि तलावांचे प्रदूषण करतात. आपलं शरीर कृत्रिम रसायने पचवायला उत्क्रांत झालं आहे का?

# गुजरातची पावले वेगात

**वेदान्त-फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेल्यानंतर महाराष्ट्रात त्यावरून खूप चर्चा रंगली, आरोप-प्रत्यारोप झाले.**

महाराष्ट्र-गुजरात या दोन्ही राज्यांची औद्योगिक प्रगतीवरून तुलनाही झाली. अर्थात, एकदा प्रकल्प हातातून निसटल्यानंतर या चर्चांचा काहीच उपयोग होणार नव्हता. आता सेमीकंडक्टर संलग्न प्रकल्पामध्ये महाराष्ट्रात मोठी गुंतवणूक होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांकडून सांगितले जात आहे. यानिमित्ताने औद्योगिकीकरणात आघाडीवर असलेल्या गुजरात राज्याविषयी थोडे जाणून घेऊ.

गुजतरातमधील ६ हजार कोटींच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भावनगरमध्ये करण्यात आली. भावनगर, बोताड आणि अमरेली जिल्ह्यांमध्ये जगातील पहिले सीएनजी टर्मिनल, एका बंदराचा विकास, कार्गो कंटेनर निर्मिती कारखाना यांसह एकूण ६ हजार कोटींचे हे प्रकल्प आहेत. तत्पूर्वी ऑगस्टमध्येही कच्छच्या विकासाशी संबंधित ४ हजार कोटींहून अधिक खर्चाच्या अन्य प्रकल्पांची पायाभरणी



आणि लोकार्पण करण्यात आले. यामध्ये पाणी, वीज, रस्ते आणि दुग्धव्यवसायाशी संबंधित प्रकल्पांचा समावेश होता.

महाराष्ट्र हे उद्योग आणि आर्थिक गुंतवणुकीत नेहमी आघाडीवर असलेले राज्य आहे हे निर्विवादच. परंतु गुजरातनेही औद्योगिक क्षेत्रात मारलेली मुसंडी दुर्लक्षून चालणार नाही. उद्योगांना प्रोत्साहन देण्याचा विषय निघतो तेव्हा महाराष्ट्राला गुजरातकडून काही गोष्टी घेण्यासारख्या आहेत, असे काही उद्योजकांचे म्हणणे आहे. एक प्रातिनिधिक उदाहरण म्हणून कच्छमध्ये नुकत्याच झालेल्या प्रकल्पांच्या पायाभरणीवर Ḥएक नजर टाकू. या वेळी पंतप्रधानांनी केलेल्या भाषणात, कच्छने केलेल्या औद्योगिक प्रगतीचे तोंड भरून कौतुक केले. कच्छमध्ये २००९मध्ये सुरू झालेल्या सरहद डेअरीमध्ये त्यावेळी एका दिवसात १ हजार ४०० लिटरपेक्षा कमी दूध संकलित होत असे. परंतु आज हीच डेअरी शेतकऱ्यांकडून दररोज ५ लाख लिटर दूध संकलित करते. या डेअरीमुळे शेतकऱ्यांना दरवर्षी सुमारे ८०० कोटी रुपयांचा लाभ होत असल्याचा उल्लेख पंतप्रधानांनी केला. या डेअरीच्या नव्या आधुनिक प्रकल्पाचेही लोकार्पण झाले.

विकासाला प्राधान्य देणारे नवे औद्योगिक धोरण आणून गुजरातने औद्योगिक विकासाचा नवा मार्ग निवडला आहे, असे सांगत या उपक्रमाचा कच्छला खूप फायदा होत असल्याचे पंतप्रधान म्हणाले. कच्छमध्ये जगातील सर्वात मोठे सीमेंट प्रकल्प आहेत. वेल्डिंग पाइप निर्मितीच्या बाबतीत कच्छचा जगात दुसरा क्रमांक लागतो. संपूर्ण जगातील दुसरा सर्वात मोठा कापड कारखाना कच्छमध्ये आहे. आशियातील पहिले विशेष आर्थिक क्षेत्र कच्छमध्ये उभारण्यात आले.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥धृ.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### मुंबईसह ठाणे, डोंबिवलीत विजांच्या कडकडाटासह मुळसधार

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यात आज सकाळपासून मुंबई, ठाणे, डोंबिवलीसह राज्यातील अनेक भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. विजांच्या कडकडाटासह या भागांत पावसाची दमदार बॅटिंग सुरु आहे. यामुळे अनेक सखल भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे नांदिवली, केळकर रोड, डोंबिवली स्टेशन परिसर आणि दादर, प्रभादेवी परिसरातील काही भाग जलमय झाला आहे.

दरम्यान मुंबई, ठाणे, डोंबिवली आणि आजूबाजूच्या परिसरात सकाळपासून ढगाळ वातावरण पाहायला मिळाले. यानंतर 10 वाजल्यापासून अनेक भागात जोरदार पावसाच्या सरी कोसळू लागल्या. डोंबिवलीमध्ये सकाळापासून 94.3 मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर ठाणे, मुंबई मध्य आणि पूर्व उपनगरातही जोरदार पावसाची नोंद झाली आहे. ज्यामुळे दादर, एल्फिन्स्टनमधील सखल भागात पाणी साचू लागल आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाचे उपसंचालक होसाळीकर यांनी ट्विट करत दिली आहे.

### शेतकरी आत्महत्या रोखणे आणि निम्मे शैक्षणिक वर्ष सरत आल्यानंतरही

# महानगरपालिका शाळांतील विद्यार्थी गणवेशापासून वंचित!

## विद्यार्थ्यांचा गणवेश चालू शैक्षणिक वर्षापासून बदलण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला होता.

। मुंबई । महाईन्यूज ।

निम्मे शैक्षणिक वर्ष सरत आले तरी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील मुलांना अद्याप गणवेश मिळालेला नाही. मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांचा गणवेश चालू शैक्षणिक वर्षापासून बदलण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला होता. ऑगस्टमध्ये गणवेशासाठी कार्यदिश देण्यात आले होते. परंतु अद्याप विद्यार्थ्यांना गणवेश मिळालेले नाहीत. गेली अनेक वर्षे मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थीनी निळ्या रंगाचा गणवेश वापरत होते. यावर्षीपासून गणवेश बदलण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. विद्यार्थ्यांना निळ्या रंगाऐवजी मोतीया रंगाचा (क्रीम कलर) गणवेश देण्यात येणार आहे. १५ सदस्यांच्या समितीने हा गणवेश निश्चित केला आहे. मात्र शाळा सुरू होऊन पाच महिने झाले तरी अद्याप विद्यार्थ्यांना नवीन गणवेश मिळालेला नाही. त्यामुळे काही विद्यार्थी जुनाच गणवेश परिधान करून शाळेत येत आहेत. तर काही विद्यार्थी गणवेशाऐवजी अन्य कपडे परिधान करून शाळेत येत आहेत. महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना दरवर्षी २७ शैक्षणिक वस्तू मोफत दिल्या जातात. यंदा मात्र शाळा सुरू झाल्या तरी शैक्षणिक वस्तूंचे वितरण न झाल्यामुळे महापालिकेवर टीका झाली होती. त्यानंतर हळूहळू एकेक वस्तू देण्यात आल्या. शिक्षण विभागाने छत्री व दप्तरासाठी विद्यार्थ्यांना रोख रक्कम दिली. मात्र गणवेश अद्यापही विद्यार्थ्यांना मिळालेला नाही.



⏭ मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थीनी निळ्या रंगाचा गणवेश वापरत होते. यावर्षीपासून गणवेश बदलण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. विद्यार्थ्यांना निळ्या रंगाऐवजी मोतीया रंगाचा (क्रीम कलर) गणवेश देण्यात येणार आहे. १५ सदस्यांच्या समितीने हा गणवेश निश्चित केला आहे. मात्र शाळा सुरू होऊन पाच महिने झाले तरी अद्याप विद्यार्थ्यांना नवीन गणवेश मिळालेला नाही. त्यामुळे काही विद्यार्थी जुनाच गणवेश परिधान करून शाळेत येत आहेत. तर काही विद्यार्थी गणवेशाऐवजी अन्य कपडे परिधान करून शाळेत येत

मुंबई महानगरपालिकेच्या सर्व शाळा आता मुंबई पब्लिक स्कूल म्हणून ओळखल्या जातात. तसेच एसएससी बोर्डव्यतिरिक्त सीबीएसई, आयसीएसई आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या शाळाही महानगरपालिकेने सुरू केल्या आहेत. या सर्व बदलांबरोबरच गणवेश बदलण्याची प्रक्रियाही शिक्षण विभागाने सुरू केली होती. यंदा महानगरपालिकेच्या शाळेत एक लाख मुलांनी नव्याने प्रवेश घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या चार लाखांवर पोहोचली आहे. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांसाठी गणवेशाच्या दोन जोडी, क्रीडा गणवेश पुरवठा करण्यास वेळ लागण्याची शक्यता आहे. गणवेश पुरवठादार निश्चित करण्याची प्रकिया जुलै अखेरीस पूर्ण झाली होती व ऑगस्टमध्ये कार्यदिश देण्यात आले होते. चार लाख विद्यार्थ्यासाठी ८८ कोटी ७८ लाख ६५ हजार ३३४ रुपये खर्च येणार आहे.

---

# बडतर्फ एसटी कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याच्या निर्णयावर!

## शिंदे सरकारवर विरोधी पक्षनेते अजित पवार यांची प्रतिक्रिया



। मुंबई । । महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या घरावर हल्ला केल्याचा आरोप असलेल्या ११८ कामगारांना पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय शिंदे सरकारने घेतला आहे. शिंदे सरकारच्या या निर्णायावर विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली. शिंदे सरकारकडून खालच्या पातळीवर जाऊन राजकारण केलं जात असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला आहे. "शिंदे सरकार सत्तेत आल्यापासून कशाही पद्धतीने वागायला लागले आहे.

कशापद्धतीने निर्णय घेणं सुरू आहे. महाविकास आघाडी सरकारने तेव्हाच्या परिस्थितीनुसार हा निर्णय घेतला होता. आता शिंदे सरकारने बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, आम्हाला त्यावर काहीही बोलयाचे नाही. महाराष्ट्रातील जन सुज्ञ आहे.

आता जनतेनेच यांचा कारभार कशापद्धतीने चालला आहे आणि किती खालच्या पातळीवर जाऊन राजकारण केलं जात आहे, याचा विचार आता जनतेनेच करावा", अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली आहे.

### बडतर्फ एसटी कर्मचारी पुन्हा सेवेत

**एसटी महामंडळाच्या विविध प्रश्नांसंदर्भात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी कर्मचाऱ्यांचे पगार, एसटीसाठीच्या उपाय योजना, सातवा आयोग, महामंडळाचं राज्य सरकारमध्ये विलीनीकरण यासह इतर महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली.**

# धनुष्यबाण कुणाचा?, ठाकरे गटाला उद्या दुपारी 2 पर्यंतची मुदत

## आयोगाकडून उद्धव ठाकरेंना पत्र

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेनेचा दसरा मेळावा झाल्यानंतर आता दोन्ही गटांत धनुष्यबाण कुणाचा? यावरून वाद सुरू आहे. अंधेरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या निवडणूक चिन्हाची लढाई सुरू आहे. आम्हीच खरी शिवसेना आहोत, असा दावा शिंदे गटाने निवडणूक आयोगाकडे केला होता. त्याला आक्षेप घेत ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. 27 सप्टेंबर 2022 रोजी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या कार्यवाहीस स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे आता हे प्रकरण पुन्हा आयोगाकडेच आले आहे. परंतु आता निवडणूक आयोगानं ठाकरे गटाला उद्या दुपारी 2 पर्यंत मुदत दिली आहे. दुपारी





दोन वाजेपर्यंत त्यांना उत्तर सादर करावे लागणार आहे. निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरेंना एक पत्र लिहिले. या पत्रातून मुदतवाढीची माहिती दिली आहे. शिंदे गटाचे वकील चिराग शाह यांच्या याचिकेचा तपशील 4 तारखेलाच ठाकरे गटाला पाठवल्याचा दावा निवडणूक आयोगानं केला आहे. शिंदे आणि ठाकरे दोन्ही गटानं धनुष्यबाण चिन्हावर दावा केला आहे. आज शिंदे गटाकडून निवडणूक आयोगापुढे कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत. तर ठाकरे गटाला उद्याची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे उद्या ठाकरे गटाकडून किती आणि कसे पुरावे सादर केले जाणार हे पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शिंदे गटाच्या वतीने 40 आमदार आणि 12 खासदारांसह लाखो प्राथमिक सदस्यांचा उल्लेख करत निवडणूक आयोगाला प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. धनुष्यबाण या निवडणूक चिन्हाची मागणी करण्याबरोबरच अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीत ठाकरे गटाकडून धनुष्यबाण चिन्हाचा गैरवापर होण्याची तक्रारही शिंदे गटाकडून करण्यात आल्याचे सांगण्यात येते.

शिवसेना आमदार रमेश लटके यांच्या निधनाने रिक्त झालेल्या अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होत आहे.

# डिजिटल करेन्सीलाच्या दिशेने आयआरबीची वाटचाल!

## पायलट प्रोजेक्टअंतर्गत होणार लॉचिंग, RBI ने सांगितला पूर्ण प्लॅन




### अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पातही केली होती घोषणा

या वर्षी फेब्रुवारीमध्ये अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या आर्थिक वर्षात RBI ने डिजिटल करेन्सी किंवा सेंट्रल बँक डिजिटल करेन्सी जारी करण्याची घोषणा केली होती. त्याचवेळी FICCI च्या एका कार्यक्रमात अर्थमंत्र्यांनी सांगितले की, सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक डिजिटल चलनाच्या विविध व्यावसायिक वापराच्या शक्यता शोधण्यात गुंतले आहेत. सरकारचा उद्देश डिजिटल करेन्सीद्वारे आर्थिक समावेशाची उद्दिष्टे पूर्ण करणे हाच नाही, तर विविध व्यावसायिक उद्दिष्टे साध्य करण्याचाही आहे.

**। राजस्थान । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

देशात डिजिटल करेन्सी लॉन्च करण्याची तयारी सुरू झाली आहे. या एपिसोडमध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया महत्त्वपूर्ण पावले उचलणार आहे. सेंट्रल बँक डिजिटल करन्सी (CNDC) या वर्षी पायलट प्रोजेक्ट अंतर्गत लॉन्च करणार आहे. आरबीआयने शुक्रवारी कॉन्सेप्ट पेपरमध्ये ही माहिती दिली.

रिझर्व्ह बँकेने सांगितले की, विशेष वापराच्या प्रकरणांसंदर्भात डिजिटल करेन्सीला पायलट प्रोजेक्टअंतर्गत लाँचिंग केले जाईल.

भारतीय रिझर्व्ह बँकेने सांगितले की, सेंट्रल बँक डिजीटल करेन्सीवरील कॉन्सेप्ट नोट जारी करण्यात आली आहे. जेणेकरून लोकांमध्ये डिजिटल करेन्सी आणि डिजिटल रुपयाच्या वैशिष्ट्यांबद्दल जागरूकता निर्माण होईल. डिजिटल करेन्सी महत्त्वाची का आहे?

क्रॉस बॉर्डर पेमेंटसाठी डिजिटल करेन्सी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. आरबीआय देखील या प्रयत्नात सतत गुंतले आहे आणि या संदर्भात अमेरिकन फिनटेक कंपनी एफआयएसशी चर्चा सुरू आहे.

भारतीय रिझर्व्ह बँक काही काळ सेंट्रल बँक डिजिटल चलनाचे फायदे आणि तोटे यांचे मूल्यांकन करेल आणि त्या दिशेने काम सुरू आहे.

डिजिटल करेन्सी सुरू लाँच करण्यापूर्वी चार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना सेंट्रल बँक डिजिटल करन्सी (CBDC) साठी पॉयलट प्रोजेक्ट सुरू करण्यास सांगितले आहे.

डिजिटल करेन्सीमुळे नागरिकांना रोख ठेवण्याची गरज भासणार नाही. हे देखील मोबाईल वॉलेटप्रमाणे काम करेल. विशेष म्हणजे डिजिटल चलन ठेवण्यावरही लोकांना व्याज मिळणार आहे. तुम्ही तुमच्या मोबाईल वॉलेटमध्ये डिजिटल करेन्सी ठेवू शकता किंवा तुमच्या खात्यात ठेवू शकता.

## धक्कादायक! झारखंडमध्ये मुलीला जिवंत जाळले



**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

झारखंडमधील दुमका येथे एका मुलीला पेट्रोल ओतून जाळल्याची घटना समोर आली आहे. एका विवाहित तरुणाला बळजबरीने तिच्याशी लग्न करायचे होते. मात्र, कुटुंबीयांनी नकार दिल्यानंतर त्याने तरुणीला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 19 वर्षीय मारुती कुमारी या मुलीला आरोपी राजेश राऊत याने जीवे मारण्याचा प्रयत्न केला. मारुती कुमारी ही तिच्या आजीसोबत झोपली होती. त्यावेळी लग्नासाठी नकार दिल्याने रागाच्या भरात राजेशने तिच्या अंगावर पेट्रोल टाकून तिला पेटवून दिले. या अपघातात मारुती 70 टक्के भाजल्याची माहिती पोलिसांनी दिली. जारमुंडी ब्लॉकमधील भालकी गावात ही घटना घडली.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपी राजेश राऊतला अटक केली. तसेच, याप्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, मुलीला गंभीर भाजलेल्या अवस्थेत उपचारासाठी रांचीला पाठवण्यात आले असल्याची माहिती जारमुंडीचे डीएसपी शिवेंद्र यांनी दिली.

अचानक घडलेल्या या घटनेने घाबरलेल्या कुटुंबीयांनी तिला तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. त्यानंतर तिला रांचीला पाठवण्यात आले. राजेश राऊतने घरात घुसून अंगावर पेट्रोल टाकून पेटवून दिल्याचे मुलीने निवेदनात म्हटले आहे. त्याला तिच्याशी जबरदस्तीने लग्न करायचे आहे. "आरोपी राजेश राऊत हा पाकूर जिल्ह्यातील महेशपूर पोलिस स्टेशन हद्दीतील रामगढचा रहिवासी आहे.

## शिंदे 'धनुष्यबाण' चिन्हावर दावा करु शकत नाहीत, उद्धव ठाकरेंचा मोठा दावा

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



एकनाथ शिंदे 'धनुष्यबाण' चिन्हावर दावा करु शकत नाहीत. त्यांनी आणि त्यांच्या समर्थक आमदारांनी स्वेच्छेने पक्ष सोडला असल्याची भूमिका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मांडली आहे. शिवसेना आणि शिंदे गटामध्ये 'धनुष्यबाण' चिन्हासाठी सुरु असलेली निवडणूक आयोगापर्यंत पोहोचली असून आज याप्रकरणी सुनावणी पार पडली. निवडणूक आयोगाने शिवसेनेला एकनाथ शिंदेंच्या दाव्यावर शनिवारी संध्याकाळपर्यंत उत्तर दाखल करण्यास सांगितलं आहे.

निवडणूक आयोगाने पत्राच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांना ८ ऑक्टोबरला म्हणजेच शनिवारी दुपारी २ वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रांसह आपली बाजू मांडण्याचा आदेश दिला आहे. जर शिवसेनेच्या वतीने कोणतंही उत्तर आलं नाही, तर याप्रकरणी योग्य तो निर्णय घेतला जाईल असंही निवडणूक आयोगाने पत्रात स्पष्ट केलं आहे.

शिवसेनेच्या बहुसंख्य लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या मुख्य नेतेपदी, तसेच अध्यक्षपदी निवड केलेली असल्याने पक्षाचे धनुष्यबाण हे चिन्ह आम्हालाच मिळाले पाहिजे" असा अर्ज शिंदे गटाने निवडणूक आयोगाकडे केला आहे. उद्धव ठाकरे गटाकडे पुरेसे समर्थन नसतानाही हा गट बेकायदेशीरपणे अंधेरी पोटनिवडणुकीत धनुष्यबाण चिन्ह वापरण्याची शक्यता असल्याने या अर्जावर तातडीने निर्णय घेण्याची विनंती शिंदे गटाने केली आहे.

## कर्नाटकमध्ये जमावाची मशिदीमध्ये घुसखोरी

### परिसरात जबरदस्तीने केली पूजा, 'भारत माता की जय'च्या घोषणा

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**




कर्नाटकमध्ये मदरसा आणि मशिदीच्या आवारात घुसखोरी करत पूजा केल्याप्रकरणी पोलिसांनी नऊजणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. बिदरमधील ऐतिहासिक महमूद गवान मदरसा आणि मशिदीमध्ये जमावाने घुसखोरी केल्याचा आरोप आहे. जमावाने परिसरातील एका कोपऱ्यात पूजा घातली असा दावा आहे. तसंच जमावाने घोषणाबाजी करत तोडफोड केल्याचंही सांगितलं जात आहे.

या घटनेचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यानंतर पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली आहे. एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनीही ट्विटरला कथित घटनेचा व्हिडीओ शेअर केला आहे. यावेळी त्यांनी पोलीस आणि भाजपाला लक्ष्य केलं असून, मुस्लिमांचं महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न सुरु असल्याचा आरोप केला आहे ६ ऑक्टोबरला दसऱ्याच्या दिवशी ही घटना घडल्याचं सांगितलं जात आहे. मुस्लिम संघटनांनी या घटनेचा निषेध केला आहे. काही लोक गेट तोडून आत घुसले आणि 'भारत माता की जय' अशा घोषणा दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल करण्यात आली आहे. तसंच जमावाने सुरक्षारक्षकाला धमकावलं आणि मशिदीच्या भिंतींजवळ कचरा फेकला असा त्यांचा आरोप आहे.

आरोपींविरोधात कठोर कारवाई करण्यात आली नाही तर शुक्रवारी आंदोलन करु असा इशारा त्यांनी दिला. यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करत नऊ जणांना अटक केली आहे.

पोलीस अधिक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, "निजामच्या काळापासून दसऱ्याला पूजा करण्याची परंपरा आहे. मशिदीच्या आवारात एक मिनार आहे. नेहमी दोन ते चार लोक आतमध्ये पूजा करण्यासाठी जातात. पण यावेळी मोठ्या संख्येने लोक आतमध्ये गेले होते. कोणीही बेकायदेशीरपणे गेट तोडून आतमध्ये घुसखोरी केलेली नाही. आम्ही गुन्हा दाखल केला आहे". पोलीस महानिरीक्षकांनी सांगितलं आहे की "हिंदू मशिदीच्या जवळ असणाऱ्या झाडाजवळ जाऊन नेहमी पूजा करतात. पण यावेळी तिथे ते झाड नव्हतं.

# ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना 'झी टॉकीज'चा मानाचा मुजरा



मराठी चित्रपटसृष्टीत विनोदी चित्रपटांचा काळ गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना नुकतेच 'झी टॉकीज कॉमेडी पुरस्कार २०२२'च्या मंचावर विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार प्रदान करताना संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेले होते. चित्रपटसृष्टीतील कलाकारांपासून राजकीय नेत्यांपर्यंत अशोक सराफ यांच्या अभिनयाचे चाहते मोठ्या प्रमाणावर आहेत. अशोक सराफ यांच्या वयाची पंच्याहत्तरी आणि अभिनय कारकीर्दीची पन्नाशी या दुग्धशर्करा योगाचे औचित्य साधत यंदाचा झी टॉकीज कॉमेडी पुरस्कार सोहळ्यात हा क्षण खास थाटामाटात साजरा करण्यात आला. विनोदाच्या टायमिंगचा बादशाह

अशोक सराफ यांच्याकडे अभिनयाची ताकद आणि विनोदाच्या टायमिंगची किल्लीच होती. 'पांडू हवालदार', 'धूमधडाका', 'बिनकामाचा नवरा', 'गंमत जम्मत', 'वजीर', 'चौकट राजा' अशा अनेक चित्रपटांमध्ये कधी विनोदी, तर कधी गंभीर अशा भूमिका त्यांनी उत्तम वठवल्या.

# 'हर हर महादेव'मध्ये अमृता खानविलकर साकारणार बाजीप्रभु देशपांडे यांच्या पत्नीची भूमिका



'हर हर महादेव' चित्रपटामध्ये अभिनेत्री अमृता खानविलकर बाजीप्रभु देशपांडे यांच्या पत्नीची भूमिका साकारणार आहे. तिचा या चित्रपटामधील लूक समोर आला आहे. सध्या मराठीमध्ये ऐतिहासिक चित्रपटांची लाट आहे असं म्हणणं वावगं ठरणार नाही. नुकताच डॉ. अमोल कोल्हे यांचा 'शिवप्रताप गरुडझेप' चित्रपट प्रदर्शित झाला. आता काही दिवसांपूर्वीच झी स्टुडिओने 'हर हर महादेव' या ऐतिहासिक चित्रपटाची घोषणा केली. या चित्रपटात मराठीतील सुप्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारताना दिसणार आहे. आता या चित्रपटामधील आणखी एका कलाकाराचं नाव समोर आलं आहे. अभिनेता शरद केळकर चित्रपटामध्ये बाजीप्रभु देशपांडे यांची भूमिका साकारताना दिसणार आहे. काही दिवसांपूर्वीच बाजीप्रभु देशपांडे यांच्या लूकमधील शरदचं पोस्टर प्रदर्शित करण्यात आलं. आता अभिनेत्री अमृता खानविलकरची या चित्रपटामध्ये एण्ट्री झाली आहे. तिने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटद्वारे चित्रपटामधील लूक शेअर करत याबाबत माहिती दिली.


अमृता 'हर हर महादेव'मध्ये बाजीप्रभू देशपांडे यांच्या पत्नी सोनाबाई देशपांडे यांची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटामधील तिचा लूक समोर आला आहे. नाकात नथ, कपाळावर टिकली, खांद्यावर पदर, लक्षवेधी नजर असा अमृताच लूक या पोस्टरमध्ये दिसत आहे. तिने 'हर हर महादेव'मधील आपला लूक शेअर करताना म्हटलं की, "योद्ध्याच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहत घराचा डोलारा सांभाळणारी स्त्रीदेखील योद्धाच असते. गनिमांना कंठस्नान घालणाऱ्या बाजीप्रभू देशपांडे यांच्या पत्नी सोनाबाई देशपांडे यांची भूमिका साकारत आहेत अभिनेत्री अमृता खानविलकर. लढण्यासाठी लाखो हत्तींचं बळ देणाऱ्या शिवमंत्राचा आवाज संपूर्ण हिंदुस्थानात घुमणार. येत्या दिवाळीत २५ ऑक्टोबरपासून 'हर हर महादेव' मराठी, हिंदी, तमिळ, तेलुगू आणि कन्नड या ५ भाषांमधून आपल्या भेटीला येणार." अमृताचा हा लूक प्रेक्षकांच्या पसंतीस पडत आहे.

# आलिया-रणबीरला माधुरी दीक्षितने दिलं खास गिफ्ट

बॉलिवूडमधील लोकप्रिय जोडी आलिया भट्ट आणि रणबीर कपूर लवकरच आई-बाबा होणार आहेत. नव्या पाहुण्याच्या आगमनासाठी कपूर कुटुंबीय जय्यत तयारी करत आहेत. रणबीरची आई व प्रसिद्ध अभिनेत्री नीतू कपूरही आजी होणार असल्यामुळे उत्सुक आहेत. नुकतंच त्यांनी कलर्स वाहिनीवरील 'झलक दिखला जा' शोमध्ये हजेरी लावली. 'झलक दिखला जा' या शोचा दहावा सीझन सध्या सुरू आहे. हा शो प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असून बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित आणि दिग्दर्शक करण जोहर याचे परिक्षण करत आहेत. नीतू कपूर यांनी हजेरी लावलेल्या भागात स्पर्धकांनी खास डान्स सादर केले. हा भाग कपूर स्पेशल म्हणून सेलिब्रेट करण्यात आला. आलिया-रणबीरच्या विवाहसोहळ्यातील खास क्षणांचे दृश्यही डान्सद्वारे दाखवण्यात आले.

# 'पुष्पा 2'मध्ये होणार आघाडीच्या बॉलिवूड अभिनेत्याची एंट्री

अल्लू अर्जुनचा 'पुष्पा' हा चित्रपट तुफान गाजला. त्यापाठोपाठ या चित्रपटाचा पुढील भाग कधी प्रदर्शित होतोय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांना फार उत्सुकता लागली आहे. या चित्रपटाबद्दलचे सगळे अपडेट्स या चित्रपटाची टीम चाहत्यांना देत आहे. आता या चित्रपटात एका आघाडीच्या बॉलिवूड कलाकाराची एंट्री होणार असल्याचे समोर आले आहे. अल्लू अर्जुनच्या डॅशिंग स्टाईलने 'पुष्पा'चा



शेवट करण्यात आला होता. त्यामुळे या चित्रपटाच्या पूढील भागात पोलिस आणि पुष्पा यांच्यातील संघर्ष पाहायला मिळणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. अशातच असे म्हटले जात आहे की 'पुष्पा २'ला बॉलिवूड टच देण्यासाठी निर्माते अर्जुन कपूरला चित्रपटात कास्ट करण्याचा विचार करत आहेत. या चित्रपटात अर्जुन पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. निर्मात्यांना 'पुष्पा २' हा 'पुष्पा: द राइज' पेक्षा खूप मोठा बनवायचा आहे आणि बॉलिवूड प्रेक्षकांना या चित्रपटात गुंतवून ठेवायचे आहे म्हणून ते अर्जुनचा विचार करत आहेत.

# राखी सावंतला बनायचे आहे मुख्यमंत्री



राखी सावंतला बनायचे आहे मुख्यमंत्री, पद मिळाल्यावर सर्वात आधी करणार 'हे' काम

हिंदी मनोरंजनसृष्टीत ड्रामा क्वीन म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री राखी सावंत नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. तिचा बॉयफ्रेंड आदिल दुर्रानीबरोबरचे फोटो, व्हिडीओ शेअर करत ती सगळ्यांचं लक्ष तिच्याकडे वळवत असते. त्याचप्रमाणे ती वरचेवर करत असलेली विधानेही चर्चेचा विषय ठरत असतात. नुकतेच तिने तिचे एक स्वप्न शेअर केले आहे. मुख्यमंत्री झाल्यावर ती काय सुधारणा घडवून आणेल याबाबत तिने तिचे प्लॅन्स सांगितले आहेत. राखी सावंतचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये राखी सावंतने ती मुख्यमंत्री झाली तर काय करायला आवडेल यावर भाष्य केले आहे. ती म्हणाली, "जर मला मुख्यमंत्री बनवलं तर मी ड्रीम गर्ल हेमा मालिनी यांच्या गोऱ्या गालांसारखे आणि गोऱ्या कंबरेसारखे रस्ते तयार करेन. आमच्या ड्रीम गर्लसारखे मी रस्ते सुंदर बनवीन. आपल्या देशात भरपूर खड्डे आहेत. तुम्ही हे विनोदामध्ये घेऊ नका." चहा बनवून मोदीजी पंतप्रधान झाले तर बसून, आडवी पडून, हसत- हसत मी मुख्यमंत्री का होऊ शकत नाही?" असा प्रश्नही तिने शेवटी उपस्थित केला. तिच्या या विधानाची सर्वत्र जोरदार चर्चा रंगली आहे. या व्हिडीओवर नेटकरी कमेंट्स करत तिची

## शॉर्ट न्यूज »

### सौरव गांगुली राजीनामा देण्याच्या तयारीत



।नवी दिल्ली। महाईन्यूज

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) दिग्गजांच्या दोन महत्त्वाच्या बैठका गुरुवारी दिल्लीत पार पडल्या. यामध्ये बीसीसीआयचे अध्यक्ष सौरव गांगुली, सचिव जय शाह, उपाध्यक्ष राजीव शुक्ला, माजी अध्यक्ष एन. श्रीनिवासन, कोषाध्यक्ष अरुण सिंग धुमाळ, आयपीएलचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी सचिव निरंजन शहा, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा सहभागी झाले होते.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सौरव गांगुली पुढील निवडणूक लढवणार नाही, मात्र मंडळाचे सचिव जय शहा हे नवीन अध्यक्षपदाच्या शर्यतीत नाहीत. १९८३ च्या विश्वचषक चॅम्पियन संघातील सदस्यांपैकी एक, रॉजर बिन्नी आणि काँग्रेस नेते राजीव शुक्ला, जे कर्नाटकचे आहेत, ते अध्यक्ष, सचिव किंवा आयपीएल चेअरमन होऊ शकतात. विद्यमान खजिनदार आणि केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांचे भाऊ अरुण हे त्याच पदासाठी पुन्हा उमेदवारी देऊ शकतात.

### थायलंडकडून पराभव होणाऱ्या पाकिस्तानकडून

# टीम इंडियाचा पराभव!

## ऋचा घोषची वादळी फलंदाजी

सिल्हेट ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



महिलांच्या आशिया चषक स्पर्धेत आज भारत विरुद्ध पाकिस्तान अशी लढत पाहायला मिळाली. या गट सामन्यात भारतीय महिलांचा पाकिस्तान महिला संघाकडून पराभव झाला. गुरुवारी थायलंडकडून पराभवाचा धक्का बसलेल्या पाकिस्तानने १३ धावांनी विजय मिळवत स्पर्धेतील वाटचाल कायम राखली. भारत आणि पाकिस्तानचे स्पर्धेत चार सामन्यांनंतर सहा गुण झाले आहेत.

एका दिवसापूर्वी थायलंडसारख्या छोट्या संघाकडून पराभूत झालेल्या पाकिस्तानी महिलांकडून टीम इंडियाने सामना गमावला. आशिया चषक २०२२ मधील एका महत्त्वाच्या सामन्यात, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाने गोलंदाजी आणि नंतर फलंदाजी दोन्हीमध्ये खराब कामगिरी केली. ऋचा घोष वगळता तिच्या एकाही फलंदाजाला प्रभावी कामगिरी करता आली नाही. घोषने १३ चेंडूत एक चौकार आणि तीन षटकारांसह २६ धावा ठोकल्या, पण ती बाद झाल्यानंतर भारत विजयापासून १३ धावा दूर होता.

थायलंडकडून पराभूत झाल्यानंतर लाजिरवाणे झालेल्या पाकिस्तान संघाने अप्रतिम कामगिरी केली. विशेषतः निदा दारने ३७ चेंडूत ५ चौकार आणि १ षटकार खेचून नाबाद ५६ धावांची खेळी केली, तर गोलंदाजीत २४ धावांत दोन महत्त्वाचे बळी घेतले. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने ६ बाद १३७ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय महिला संघ सर्व विकेट्स गमावून केवळ १२४ धावांपर्यंत मजल मारू शकला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तान संघाची सुरुवात चांगली झाली. मुनीबा अली आणि अमीन यांनी पहिल्या विकेटसाठी २४ धावा केल्या. यानंतर कर्णधार बिस्माह मारूफने ३५ चेंडूंत २ चौकारांच्या मदतीने ३२ धावांची चांगली खेळी केली. शेवटच्या षटकांमध्ये निदा दारने तुफानी फलंदाजी करताना पाकिस्तानला चांगल्या धावसंख्येपर्यंत नेले. भारताकडून दीप्ती शर्माने ३, तर पूजा वस्त्राकरने २ बळी घेतले. रेणुका सिंगला एक विकेट मिळाली.

प्रत्युत्तरात मेघना आणि स्मृती मानधना यांनी टीम इंडियाला चांगली सुरुवात करून दिली, मात्र २३ धावांवर पहिली विकेट गमावल्यानंतर टीमची धावसंख्या ६५ धावांवर ५ अशी झाली होती. मेघना १५, मानधना १७, जेमिमा २, पूजा वस्त्राकर ५ आणि हेमलता २० धावांवर बाद झाल्या. पूजाचा धावबाद संघाच्या विरोधात गेला. दीप्ती शर्मा १६ आणि हरमनप्रीत कौर १२ धावांवर बाद झाल्या. क्षेत्ररक्षणादरम्यान दुखापतग्रस्त झालेल्या रिचाने अखेरच्या षटकात चांगली फलंदाजी केली, पण ती संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. नशरा संधूने ३, तर सादिया इक्बाल आणि निदा दार यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

### 15 ऑक्टोबरला अंतिम सामना होणार

पाकिस्तानच्या विजयाने २०१६ पासून सहा वर्षांतील भारताचा सलग पाच टी२० विजयांचा सिलसिला संपला. भारताचा पाकिस्तानविरुद्धचा शेवटचा पराभव १९ मार्च २०१६ रोजी दिल्लीत महिला टी२० विश्वचषकादरम्यान झाला. १३ सामन्यांत 10 विजयांसह ट्वेंटी -२० मध्ये भारताने अजूनही पाकिस्तानवर आघाडी घेतली आहे. भारताचे ग्रुप स्टेजमध्ये बांगलादेश आणि थायलंड विरुद्ध दोन सामने शिल्लक आहेत. हे सामने शनिवार आणि सोमवारी खेळवण्यात येतील. दरम्यान, अंतिम गटात पाकिस्तानचा सामना संयुक्त अरब अमिराती आणि श्रीलंकेशी होणार आहे. त्यानंतर गटातील अव्वल चार संघ उपांत्य फेरीत जातील. १५ ऑक्टोबरला त्याच मैदानावर अंतिम सामना होणार आहे.

# दोन्ही गटात महाराष्ट्राची विजयी सलामी!

## फेडरेशन चषक रोलबॉल स्पर्धा : जम्मू काश्मीर, तामिळनाडू पराभूत

।पुणे । महाईन्यूज ।

**मुलांच्या गटात महाराष्ट्र संघाने जम्मू काश्मीर संघाला तर मुलींच्या गटात तामिळनाडू संघाला पराभूत करताना महाराष्ट्र रोलबॉल संघटनेने आयोजित केलेल्या ३ ऱ्या फेडरेशन चषक रोलबॉल स्पर्धेत विजयी सलामी दिली. पुणे स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोलते, भारतीय रोलबॉल संघटनेचे सचिव चेतन भांडवलकर, महाराष्ट्र रोलबॉल संघटनेचे अध्यक्ष संदीप खर्डेकर, पुणे जिल्हा रोलबॉल संघटनेचे अध्यक्ष गजानन थरकुडे, रोलबॉल खेळाचे जनक राजू दाभाडे आदी मान्यवर उद्घाटनावेळी उपस्थित होते.**





जिल्हा रोलबॉल संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या स्पर्धेत मुलांच्या गटात महाराष्ट्र संघाने जम्मू काश्मीर संघाला ४-२ असे पराभूत करतना विजय साकारला. मध्यंतराला महाराष्ट्र संघाने ३-० अशी निर्णायक आघाडी घेतली होती. महाराष्ट्र संघाकडून मधुसुधन रत्नपारखीने ३ (०.३१, ५.४३, १७.१७ मिनिटे ) तर अथर्व धायगुडे (९.५१ मिनिटे) याने एका गोल करताना संघाला विजय मिळवून दिला. जम्मू काश्मीर संघाकाडून मनविजय स्लाथियाने २ (११.११, १३.५६ मिनिटे ) गोल करताना लढत देण्याचा प्रयत्न केला.

मुलींच्या गटातील लढतीमध्ये महाराष्ट्र संघाने तामिळनाडू संघाला ६-२ असे पराभूत केले. मध्यंतराला महाराष्ट्र संघाने ४-१ अशी ३ गोलांची आघाडी घेतली. श्रुती भगत (३.०२ मिनिटे), अंजली कपूर (४.०४ मिनिट), महेक राउत (८.०० मिनिटे), सुहानी सिंग (८.५५ मिनिट), तेजस्विनी यादव (१३.०० मिनिट) तर सई शिंत्रे (१७.३५ मिनिटे) यांनी प्रत्येकी १ गोल केला. तामिळनाडू संघाकाडून के. निवेदिता फेन्सी (६.०१ मिनिटे) तर कौशिका टी.ने (१८.३० मिनिटे) प्रत्येकी १ गोल केला.

मुलांच्या गटातील अन्य लढतीमध्ये गोवा संघाने राजस्थान संघाला ५-१ असे पराभूत केले. गोवा संघाने १-० अशी मध्यंतराला आघाडी घेतली होती. गोवा संघाकडून श्रेयस बोंबले (१०.४३, १५.३८ मिनिटे) व सौरभ भालेराव (५.३१, १३.५७ मिनिटे) यांनी प्रत्येकी २ तर कुणाल साखरेने १ (१३.०६ मिनिटे) गोल केला. राजस्थान संघाकडून अभय इनकीयाने एकमेव गोल (१८.५३ मिनिटे) केला. मुलींच्या गटाच्या अन्य लढतीमध्ये राजस्थान संघाने छत्तीसगड संघाला ३-१ असे पराभूत केले. मध्यंतराला राजस्थान संघाने २-१ अशी आघाडी घेतली होती. राजस्थान संघाकडून पूजा चौधरीने २ (४.५०, १३.१७ मिनिटे) तर प्रीतीका तारावत (११.५० मिनिटे) हिने १ तर छत्तीसगड संघाकडून परमदीप कौर (१०.५१ मिनिटे) हिने एक गोल केला.